महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १ ला | दिनांक : २०/१२/२०२५ | वार : शनिवार

## सत्य लपत नाही, दुसरा मंत्रीही राजीनामा देणार : उद्धव ठाकरे



**मुंबई** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी महायुती सरकारच्या आणकी एका मंत्र्यावर राजीनाम्याची टांगती तलवार असल्याचा दावा केला आहे. कालच एका मंत्र्याचा राजीनामा झाला. आणखी एक मंत्री जायच्या वाटेवर आहे. पण मुख्यमंत्री त्याच्यावर पांघरून घालत आहेत, असे त्यांनी म्हटले आहे. त्यांच्या या विधानामुळे हा दुसरा मंत्री कोण? याविषयी राजकीय वर्तुळात खमंग चर्चा रंगली आहे.

महापालिका निवडणुकांच्या तोंडावर ठाकरे गटातील इनकमिंग वाढली आहे. आजही मुंबई व उपनगरासह छत्रपती संभाजीनगर येथील कार्यकर्त्यांनी ठाकरे गटात प्रवेश केला. यावेळी त्यांना मार्गदर्शन करताना उद्धव ठाकरे यांनी माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा, डान्स बार, ड्रग्जचा व्यवहार आदी मुद्यांना स्पर्श करत सत्ताधारी महायुतीवर एकच हल्लाबोल केला. आज आपल्याकडे भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेसचे लोक येत आहेत. सध्या देशात आणि राज्यात जो काही अंदाधुंद कारभार चालला आहे, तो भयानक आहे. गेल्या काही दिवसांपासून राज्यात जे काही सुरू आहे, ते आपण पाहात आहात. मीडियामध्ये सखोलपणे गोष्टी येत नसल्या, तरी सत्य काही लपून राहत नाही. कालच एका मंत्र्याचा राजीनामा झाला आहे. आणखी एक मंत्री जायच्या वाटेवर आहेत. परंतु, मुख्यमंत्री त्यांना पांघरूण घालत आहेत, हे विचित्र आहे.

उद्धव ठाकरे यांनी यावेळी एकनाथ शिंदेंचे नाव न घेता त्यांच्यावरही निशाणा साधला. ते म्हणाले, तुम्ही ड्रग्जचा व्यवहार करणाऱ्यांना मत देणार का? अंमली पदार्थांचा धंदा करणाऱ्यांच्या हातात आपल्या मुलाबाळांचे आयुष्य देणार आहात का? राजकारणासाठी माणसे लागतात. पण ती माणसे कशी पाहिजेत? गुंड सुद्धा चालतील... ड्रग्जचा व्यवहार करणारे सुद्धा चालत आहेत. ... आणि ज्यांचे नाव याच्याशी जोडले जात आहे... तुमच्यापर्यंत बातमी आली ना. आता त्या भावालाही वाचवण्याचा प्रयत्न होत आहे. अरे हे कोणते राज्य आहे? कुणासाठी राज्य आहे? याच्या आधी जे अधिवेशन झाले त्यावेळी विरोधकांनी डान्स बारचा विषय पुराव्यानिशी बाहेर काढला.

अवैध उत्खननाचे प्रकरण पुराव्यानिशी बाहेर काढले. आता सुद्धा हा जो काही ड्रग्जचा कारखाना आहे तो सुषमा ताईंनी कागदोपत्री पुराव्यानिशी जनतेसमोर आणला आहे. त्यानंतरही मुख्यमंत्री त्याची दखल घ्यायला तयार नाहीत. ते स्वतः गृहमंत्रीही आहेत. आही अगदी केंद्रीय मंत्र्यांकडेही हे पुरावे व निवेदन देत आहोत. आता ते काय करतात ते बघायचे आहे, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

ते पुढे म्हणाले, तुम्ही कोणत्याही जातीधर्माचे जातीधर्माचे असला तरी मी एक प्रश्न विचारतो. आपल्या महाराष्ट्राची मुले अंमली पदार्थांच्या आहारी जाणार असतील तरी देखील आपण त्यांना वाचवणाऱ्यांना आणि ते धंदे करणाऱ्यांना मत देणार आहात का? आपल्या मुलाबाळांचे आयुष्य त्यांच्या हाती देणार आहात का? हा ज्याचा त्याने विचार करायचा आहे.

## माणिकराव कोकाटेंची तुरुंगवारी टळली : हायकोर्टाकडून १ लाखाचा जामीन मंजूर; पण शिक्षेला स्थगिती नाही



**मुंबई** : अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्याकडून त्यांचे क्रीडा खाते काढून घेण्यात आले असून आता त्यांचा राजीनामा देखील स्वीकारण्यात आला आहे. माणिकराव कोकाटे यांच्या प्रकरणावर मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. त्यात त्यांना एक लाखाच्या जातमुचलक्यावर जामीन मंजूर करण्यात आला.

मात्र, ते दोषी असल्याचे कोर्टाने मान्य करत त्यांच्या शिक्षेला स्थगिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे त्यांची तुरुंगवारी तूर्तास टळली आहे. परंतु, त्यांच्या आमदारकीवरची टांगती तलवार कायम आहे.

मुंबई उच्च न्यायालयात सुनावणीला सुरुवात झाली असून यावेळी दोन्ही पक्षांचा जोरदार युक्तिवाद होत असल्याचे समजते. तसेच कोकाटे यांचे वकील रवींद्र कदम यांनी कोकाटे यांना सोमवार किंवा मंगळवारपर्यंत दिलासा द्यावा, अशी मागणी केली असल्याचे समजते. तर सरकारी वकिलांनी म्हटले की कोकाटे यांना न्यायालयाकडून अटक वॉरंट जारी झाला असूनही कोकाटे सरेंडर झाले नसल्याचे म्हटले आहे. ही सुनावणी न्यायमूर्ती लड्डा यांच्यासमोर झाली.

रवींद्र कदम यांनी माणिकराव कोकाटे यांची बाजू मांडताना म्हटले की, घर मिळाल्याची तारीख आणि घर घेतल्यानंतरची आर्थिक परिस्थिती बदलत असते. यावर PWDने काय क्रॉस एक्झॅमिनेशन केले आहे तेही बघून घ्या, अशा सूचना कोर्टाने दिल्या आहेत. तसेच कदम यांच्याकडून कोकाटे यांची आर्थिक परिस्थिती कशी बदलली आहे याचे जुने आणि नवे संदर्भ मांडण्यात आले.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये दुचाकीधारकांना महागाईचा धक्का



**छत्रपती संभाजीनगर** : शहरातील दुचाकीधारकांना आता आपल्या वाहनाच्या देखभालीसाठी जास्तीचे पैसे मोजावे लागणार आहेत. औरंगाबाद टू-व्हीलर मेकॅनिक संघटनेने आयोजित केलेल्या मराठवाडा विभागीय मेळाव्यात दुचाकी सर्व्हिसिंगचे दर वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. येत्या २६ जानेवारीपासून शहरात दुचाकी सर्व्हिसिंगसाठी ३०० रुपयांऐवजी ४०० रुपये आकारले जाणार असल्याची घोषणा संघटनेचे अध्यक्ष सय्यद चाँद यांनी केली.

तापडिया नाट्यमंदिरात पार पडलेल्या या मेळाव्यात मराठवाड्याच्या विविध जिल्ह्यांतील सुमारे २२०० मेकॅनिक उपस्थित होते. या वेळी नागपूरचे अध्यक्ष निशिकांत पोहनकर यांनी बदलत्या तंत्रज्ञानानुसार मेकॅनिक्सनी स्वतःला अपडेट करण्याचे आवाहन केले. आगामी काळात इलेक्ट्रिकल वाहनांच्या दुरुस्तीवर अधिक लक्ष केंद्रित केले जाणार असून, तालुक्याच्या ठिकाणी विशेष ट्रेनिंग सेंटर उभारण्याचा आणि मेकॅनिक्सचा ग्रुप इन्शुरन्स काढण्याचा महत्त्वपूर्ण निर्णयही या मेळाव्यात घेण्यात आला.

**४०० रुपयांत या सुविधा**

- स्पार्क प्लगची स्वच्छता आणि एअर फिल्टरची तपासणी.
- इंधनाचे योग्य प्रमाण राखण्यासाठी कार्बोरेटर सेटिंग.
- ड्राइव्ह चेनची स्वच्छता आणि अचूक सेटिंग.
- पुढील आणि मागील दोन्ही चाकांचे ग्रीसिंग.
- गाडीचे अॅव्हरेज (इंधन सरासरी),टॅपेट सेटिंग.
- सर्व्हिसिंगनंतर दुचाकीची पूर्णपणे धुलाई (वॉशिंग).

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २० डिसेंबर २०२५

## आंतरराष्ट्रीय जलतरण स्पर्धेत सिल्वर मेडल जिंकलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**छत्रपती संभाजीनगर :** राजमाता जिजाऊ कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय लिंबे जळगाव छत्रपती संभाजीनगर महाविद्यालयाचा विद्यार्थी रितेश राजेंद्र केरे यांनी नुकत्याच दुबई येथे झालेल्या जलतरण स्पर्धेमध्ये सिल्वर मेडल प्राप्त केल्यामुळे महाविद्यालयाचे नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर घेऊन जाणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार महाविद्यालयातर्फे करण्यात आला लिंबे जळगाव ग्रुप ग्रामपंचायतचे सरपंच श्री नवनाथ वैद्य व माजी सरपंच ग्रामपंचायत सदस्य श्री अनिस पटेल यांनी या विद्यार्थ्यांचा सत्कार केला आजच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉक्टर चंद्रशेखर आलोने प्रमुख पाहुणे श्री नवनाथ वैद्य सरपंच ग्रुप व समीर सय्यद उपसरपंच ग्रामपंचायत सदस्य लिंबे जळगाव तसेच आजच्या कार्यक्रमाचे दुसरे प्रमुख पाहुणे माननीय श्री अनिस पटेल माजी सरपंच व ग्रुप ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत सदस्य व लिंबे जळगाव ग्रुप ग्रामपंचायत सदस्य श्री भगवान जाधव तसेच जिल्हा परिषद चे मुख्याध्यापक पठाण सर हे उपस्थित होते व रहीमपूर चे मुख्याध्यापक शेख सर व लिंबे जळगाव शाळेची शिक्षक रामेश्वर पानकर सर हे उपस्थित होते व कॉलेजचे मुख्याध्यापिका पल्लवी मॅडम व दीपक साबळे शिवराई चे ग्राम पंचायत सदस्य यांची उपस्थिती होती व गावातील प्रतिष्ठित व्यक्ती यांची उपस्थिती होती व संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेश त्रिंबकराव अलोणे यांनी शुभेच्छा दिल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री राठोड सरांनी केले व प्रास्ताविक पल्लवी मॅडम व निलेश शेळके यांनी केले या कार्यक्रमासाठी सहकार्य शुभम कांबळे सर तडवी सर व नाजमीन शैख यांनी केले

## शून्य अधिक शून्य म्हणजे शून्यच : ठाकरे बंधूंच्या युतीवर आशिष शेलारांची बोचरी टीका



**मुंबई :** महानगरपालिका निवडणुकीसाठी शिवसेना ठाकरे गट आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांच्यात संभाव्य युतीचे संकेत मिळत असतानाच, भाजपने यावर जोरदार प्रहार केला आहे. भाजप नेते आणि मंत्री आशिष शेलार यांनी या युतीचा उल्लेख 'दोन शून्यांची बेरीज' असा केला आहे. युतीचा नारळ फुटण्यापूर्वीच दोन्ही बाजूंचे कार्यकर्ते एकमेकांचे डोके फोडतील अशी सद्यस्थिती आहे, असा खोचक टोला लगावत शेलार यांनी या युतीच्या यशावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. शिवसेना शिंदे गट आणि भाजप युतीबाबत बोलताना आशिष शेलार यांनी स्पष्ट केले की, महायुतीमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पूर्ण सन्मान दिला जात असून ते आमचेही नेते आहेत. आगामी निवडणुकीसाठी भाजप, शिंदे गट आणि आरपीआय यांची बैठक झाली असून आम्ही १५० पेक्षा जास्त जागा जिंकण्याचा निर्धार केला आहे. जागावाटपाबाबत बोलताना, आवश्यकतेनुसार योग्य वेळी जागा जाहीर केल्या जातील, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

आशिष शेलार यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर वैयक्तिक टीका करताना विचारले की, ठाकरेजी, तुमचा महापौर नेमका कोणत्या मोहल्ल्यातून येणार आहे? त्यांनी ठाकरे गटातील अंतर्गत मतभेदांवरही बोट ठेवले. उद्धव ठाकरेंना मानणारा आणि आदित्य ठाकरेंना मानणारा गट आता वेगळा झाला आहे, या वास्तवावर उद्धव जी किती काळ पांघरुण घालणार? असा सवाल करत त्यांनी आगामी निवडणुकीत ठाकरे गटाच्या अस्तित्वावरच शंका उपस्थित केली आहे.

दरम्यान, राज्यातील २९ महानगरपालिका निवडणुकांचे बिगुल वाजले असून येत्या १५ जानेवारी रोजी मतदान, तर १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर होणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे. या निवडणूक कार्यक्रमाच्या अधिकृत प्रसिद्धीमुळे राज्यातील राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, सर्वच प्रमुख राजकीय पक्षांनी मोर्चेबांधणी आणि रणनीती आखण्याच्या हालचालींना वेग दिला आहे.

## फाइल्स उघड्या झाल्या

फाइल्स उघड्या झाल्या, मुखवटे गळाले सारे,
सत्तेच्या सिंहासनाखाली साप निघाले सारे।

चमकदार नावांची गर्दी, काळे डाग कपाळी,
देहाच्या बाजारात इथे माणुसकी विकले सारे।

बेटावर स्वप्नं विकली, नरकाची दारं उघडी,
हसत हसत नराधमांनी बालपण जाळले सारे।

एक हातात सत्ता होती, एक हातात कॅमेरा,
न्यायाला गप्प बसवून सौदे ठरले सारे।

'मी नव्हतो तिथे' म्हणती, नाव फक्त यादीत,
पण मौनाचं ओझं वाहती, दोषी ठरले सारे।

पीडितही रिक्रूटर बनली, ही कोणती न्यायरीत?
जखमेवर जखमा देणारे नियम घडले सारे।

धर्म, देश, पद, प्रतिष्ठा—सगळं थिटं पडलं,
वासनेपुढे माणुसकीचे झेंडे पडले सारे।

इतिहास साक्षी राहील, फाइल्स फक्त पुरावा,
न्याय उशिरा येतो तरी, खूनी उघडे पडले सारे।

**प्रभाकर गायकवाड**
छत्रपती संभाजीनगर

## निधन वार्ता



**दौलताबाद (जावेद अहमद) :** देवजी लक्ष्मण हेकडे वय. १०३ वर्षे रा. माळीवाडा (ता जि. छत्रपती संभाजीनगर) (दि.१९) यांचे शुक्रवार रोजी सकाळी ११ वाजता वृद्धपकाळाने दुःखात निधन झाले. त्यांच्या वर दि. १९ शुक्रवारी सायं ४ वाजता माळीवाडा येथील घरचा मळा (हेकडे मळा) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तिन मुले, चार मुली, सुना, नातवडे असा परिवार आहे. ते माजी संरपच व ग्रापचायत सदस्या अनिता सुधाकर हेकडे याचे सासरे होते.

ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २० डिसेंबर २०२५


## जयभवानी महाविद्यालयात लेफ्टनंट आदित्य भाकरे याचा सत्कार



**पाटोदा (प्रतिनिधी) :** पाटोदा येथिल जय भवानी महाविद्यालयात पाटोदा शहरातील शहिद संजय भाकरे यांचे सुपुत्र लेफ्टनंट आदित्य भाकरे याने वडिलांचे देशसेवेचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी चार वर्षाचे एनडीए चे प्रशिक्षण पूर्ण करून आर्मीत बारा आरमाड लेफ्टनंट या पदी निवड झाल्याबद्दल वीरमाता म्हणुन आई व लेफ्टनंट आदित्य भाकरे याचा महाविद्यालयात विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी म्हणुन महाविद्यालयाच्या वत्तीने प्राचार्य डॉ. विश्वास कदम,प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे, प्राचार्य डॉ. तात्याराम सोंडगे यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.व भविष्यासाठी त्याला शुभेच्छा! देण्यात आल्या. या प्रसंगी प्रा. डॉ.संगीता आहेर, प्रा. डॉ. दत्ता तंगलवाड, प्रा. डॉ. कलदंर पठाण, प्रा. डॉ.सुनिल जाधव, प्रा. प्रकाश नाईकवाडे, प्रा.डॉ. अशोक देवगुडे. मुख्याध्यापक श्री. एल. आर. जाधव, प्रा. डॉ. गोविंद बामदळे,युवा नेते राहुल बामदळे व सर्व प्राध्यापक आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

## इकरा पब्लिक शाळेमध्ये अल्पसंख्यांक हक्क दिन साजरा





**जळगाव :** इकरा पब्लिक स्कूलमध्ये 'आंतरराष्ट्रीय अल्पसंख्याक हक्क दिन' आज उत्साहात व शिस्तबद्ध पद्धतीने साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य शेख शकील,उपप्राचार्य मोहसीन खान,प्रमुख व्याख्याते इष्टीयाक अहमद, शफीक अन्सारी, व सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते. आपल्या भाषणात वक्त्यांनी सामान्य नागरिकांचे हक्क, जबाबदाऱ्या व कर्तव्य, विविध मूल्ये यांविषयी प्रखर मते मांडून उपस्थिताची मने जिंकली. इष्टियाक सरांनी अल्पसंख्याकांना भारतीय संविधानाने दिलेले हक्क, समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाविषयी सखोल मार्गदर्शन केले. शेख शकील यांनी आपल्या भाषणात म्हटले की,भारतात विविधतेत एकता आहे. राज्यघटनेतील कलम २९ व ३० अंतर्गत अल्पसंख्यांकांसाठी महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. अल्पसंख्यांक समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी व त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी शासन अनेक उपक्रम राबविते. सांस्कृतिक समितीच्या प्रमुख आरीफ खान यांनी अतिशय सुंदर सूत्रसंचालन केले. जिया शेख यांनी आभार मानले.

## अब्दीमंडी येथे अखंड हरीनाम सप्ताह आणि ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणला सुरुवात

**दौलताबाद (जावेद अहमद) :** ह.भ.प. नारायण महाराज कोरडे यांचे कीर्तन श्रीराम मंदिर बाजार गल्ली, अब्दीमंडी, देवगिरी दौलताबाद, ता. जि. छत्रपती संभाजीनगर येथे आहे दैनंदिन कार्यक्रम पहाटे ४ ते ६ काकाडा भजन, ६.३० ते ७ विष्णूसहस्त्रनाम, ८ ते ११ ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी ४ ते ५ प्रवचन, सायं. ५ ते ६ हरीपाठ, रात्री ७ ते ९ हरीकिर्तनगुरुवार दि. श्री.ह.भ.प. परमेश्वर महाराज कोरडे यांचे कीर्तनशुक्रवार दि. १९ ह.भ.प. डॉ. जनार्दन महाराज मेटे राष्ट्रीय धर्माचार्यशनिवार दि.२० ह.भ.प. आप्पा महाराज गायके बजाजनगर रविवार दि.२१ ह.भ.प.पांडुरंग महाराज वाघ श्रीक्षेत्र देवगिरीसोमवार दि. २२ ह.भ.प.उध्दव महाराज आनंदे पालखी प्रमुख श्रीक्षेत्र देवगिरी मंगळवार दि. २३/१२/२०२५ सकाळी १० ते १२ महंत गुरुवर्य ह.भ.प. रामगिरीजी महाराज श्रीक्षेत्र गोदावरी धाम बेट सराला यांचे काल्याचे किर्तनगायनाचार्य - ह.भ.प. अरुण महाराज घोडके, ह.भ.प.राम महाराज भवर, ह.भ.प. नरेंद्र महाराज माळीवाडा, ह.भ.प. गणेश महाराज गुंजकर ह.भ.प. उमेश महाराज कदम, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज कोरडे काकडा भजन व हरीपाठ परिसरातील भाविक भक्तविष्णू सहस्रनाम सेवा अर्चना नारायण महा. कोरडे,मृंदगाचार्य - ह.भ.प. कृष्णा महाराज हिवर्डे, ह.भ.प. वेदांन्त महाराज आनंदे, ह.भ.प. सारंग महाराज हिवर्डे, ह.भ.प. श्रीधर महाराज कोरडे, यशश्री मारकळप्रमुख उपस्थिती ह.भ.प. बाबासाहेब महाराज आनंदे देवगिरी, ह.भ.प. बाबा महाराज खाडे देवगिरी, ह.भ.प. बाळकृष्ण महाराज इलग, ह.भ.प. मुरारी महाराज आनंदे देवगिरीदि २३ मंगळवारी कार्यक्रमाची सांगता होणार आहे तरी सर्व भाविक भक्तांनी सहभागी होऊन लाभ घ्यावा असे संयोजक समस्त गावकरी मंडळी अब्दीमंडी यांच्या वतीने करण्यात आली आहे

## असा पिंपळ पिंपळ

असा पिंपळ पिंपळ गावकाठावर उभा
थकलेल्या जीवांसाठी भर उन्हात गारवा

वाऱ्याच्या तालावर त्याच्या डुलतीया फांद्या
पाखरांच्या रोज रोज कशा आकाशी घिरट्या

मंद वाऱ्याची झुळुक सुगंधाची दरवळ
भावभक्तीची देवता असा पवित्र पिंपळ

पाखरांच्या घरट्यात गाणं हिरवं हळुवार
उभा पिंपळ गावात तीन पिढ्यांचा साक्षीदार

गोड आठवणी साऱ्या काळजात जपलेल्या
लेकीबाळीच्या वेदना पानावर लिहिलेल्या

उभा पिंपळ अजून जरी बदलले गाव
गाव शिवासाठी त्याच्या मनामधी गोड भाव



**ज्ञानेश्वर गायके**
कन्नड


दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

**जाहिरात दर**

| | | |
|---|---|---|
| १. | पूर्ण पान (मल्टीकलर) | ५०००/- |
| २. | अर्धे पान (मल्टीकलर) | ३०००/- |
| ३. | पाव पान (मल्टीकलर) | २०००/- |
| ४. | शुभेच्छा जाहिरात | ६००/- |

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २० डिसेंबर २०२५


## टीबी बाधित विद्यार्थिनी आरती गायकवाडसाठी १० वी बोर्ड परीक्षेची घरगुती तयारी



**छत्रपती संभाजीनगर :** मा. आयुक्त तथा प्रशासक श्री.जी.श्रीकांत सर यांच्या संकल्पनेतून तसेच उपायुक्त शिक्षण विभाग प्रमुख श्री अंकुश पांढरे सर,नियंत्रण अधिकारी श्री गणेश दांडगे सर यांचे मार्गदर्शनाखालीआज दिनांक १८/१२/२०२५ रोजी मनपा प्राथमिक व माध्यमिक शाळा मुकुंदवाडी या शाळेतील विद्यार्थिनी आरती गायकवाड या विद्यार्थिनीच्या घरी भेट देण्यात आली व तिला १० वी बोर्ड परीक्षेची पूर्व तयारीसाठी १० वी चे अपेक्षितचे प्रश्न संच सेट देण्यात आले. व तिला रोज एक प्रश्न पत्रिका सोडविण्यासाठी सांगितले तसेच रोज सुरेखा आक्षे मॅडम आरतीचा ऑनलाइन क्लाससेच सुद्धा घेणार आहे.कारण तिला टी बी हा आजार असल्याने ती शाळेत येऊ शकत नाही . त्यामुळे तिची १० वी बोर्ड परीक्षेची तयारी करून घेण्यासाठी आज कार्यक्रम अधिकारी श्री ज्ञानदेव सांगळे सर , शाळेतील केंद्रीय मुख्याध्यापक श्री के. बी. चौधरी सर , समुपदेशक भिमा हिवराळे ,साकीब शेख . शाळेतील वर्गशिक्षिका सुरेखा आक्षे मॅडम , सचिन गायकवाड सर उपस्थित होते.

# नवी मुंबई विमानतळाला नरेंद्र मोदींचे नाव?




**मुंबई :** नवी मुंबई विमानतळाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नाव देण्याचा घाट घातला जात असल्याचा आरोप काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. नवी मुंबई विमानतळाचा उल्लेख सध्या एनएम विमानतळ म्हणून केला जात आहे. विमानतळाच्या कुंपनाच्या भिंतीवरही एनएम अक्षरे कोरली जात आहेत. त्यामुळे हे एनएम म्हणजे नरेंद्र मोदी विमानतळ असे तर नाही ना असा दाट संशय बळावत चालला आहे, असे त्यांनी म्हटले आहे. सपकाळ यांनी सातारा ड्रग्ज प्रकरणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या राजीनाम्याचीही मागणी केली आहे. टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, नवी मुंबईच्या विकासासाठी स्थानिकांनी जमिनी दिल्या व त्यावेळी भूमीपुत्राच्या हक्कांसाठी दि. बा. पाटील यांनी दिर्घ लढा दिला. 12.5 टक्के योजना ही दि. बा. पाटील यांच्या आंदोलनामुळेच शक्य झाली आहे. दि. बा. पाटील यांची आमदार व खासदार अशी प्रदिर्घ राजकीय कारकिर्द राहिली आहे. नवी मुंबईत, जेएनपीटी, नैना प्रकल्प, नवी मुंबई विमानतळ विकसित होत असताना भूमिपुत्रांनी दिलेल्या योगदानाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

या विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्याची मागणी रास्त आहे. सरकारने जनभावनेचा आदर केलाच पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जरी दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचे आश्वासन दिले असले तरी त्यांचा कावा सर्वांना माहिती आहे. ‘फडणवीसांचा कावा ना कळे ब्रम्हदेवा’, असा आहे, असे सपकाळ म्हणाले.

ते पुढे म्हणाले, नवी मुंबई विमानतळाचा उल्लेख सध्या एनएम विमानतळ असा केला जात आहे. विमानतळाच्या कुंपनाच्या भिंतीवरही एनएम अक्षरे कोरली जात आहेत. हे एनएम म्हणजे नरेंद्र मोदी विमानतळ असे तर नाही ना असा दाट संशय बळावत चालला आहे. अहमदाबादच्या क्रिकेट स्टेडियमचे सरदार वल्लभभाई पटेल यांचे नाव बदलून नरेंद्र मोदी यांचे दिले आहे, पण असा कोणताही कावबाज पणा भाजपा वा देवेंद्र फडणवीस यांनी करु नये. लोकसभेत काँग्रेसच्या खासदारांनी या प्रश्नी आवाज उठवला आहे, राज्यसभेतही ही मागणी लावून धरली जाईल.

भाजपा महायुती सरकार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे जाणीवपूर्वक दि. बा. पाटील यांचे नाव देण्यास टाळाटाळ करत आहेत, परंतु कोणत्याही परिस्थितीत दुसरे नाव खपवून घेतले जाणार नाही, वेळ प्रसंगी रस्त्यावर उतरून लढा देऊ, असा इशाराही सपकाळ यांनी यावेळी दिला.

## शेतकरी पुत्राच्या लेखणीतून उमटणार बळीराजाचे वास्तव ; 'घामाने भिजलेली माती' कवितासंग्रहाचे लवकरच प्रकाशन




**छत्रपती संभाजीनगर :** ग्रामीण भागातील मातीचा सुगंध आणि तिथल्या कष्टाची चव ज्याने जवळून अनुभवली आहे, अशा एका ध्येयवेड्या तरुण शिक्षकाच्या लेखणीतून 'घामाने भिजलेली माती' हा कवितासंग्रह लवकरच साहित्याच्या दालनात येत आहे. कन्नड तालुक्यातील खेडा येथील रहिवासी असलेले संदीप संगीता नानासाहेब वाकडे यांनी आपल्या शब्दांतून शेतकरी जीवनाचे जळजळीत वास्तव मांडले असून, पुणे येथील 'लीला साहित्य पब्लिकेशन'तर्फे पुस्तक प्रकाशित होणार आहे.स्वतः एका शेतकरी कुटुंबात वाढलेल्या संदीप वाकडे यांनी बालपणापासूनच कष्ट, जिद्द आणि वेदना यांचा अनुभव घेतला आहे. शिक्षण पूर्ण करून शिक्षक म्हणून कार्यरत असतानाही, मातीशी असलेली त्यांची नाळ कधीही तुटली नाही. शेती करताना येणारा निसर्गाचा लहरीपणा, अतिवृष्टीमुळे पिकांचे होणारे नुकसान, कधी दुष्काळ तर कधी पुराचे संकट आणि त्यातून निर्माण होणारी आर्थिक ओढाताण त्यांनी अत्यंत जवळून पाहिली आहे. याच अनुभवांना शब्दांची धार देऊन त्यांनी हा काव्यसंग्रह साकारला आहे.या संग्रहामध्ये एकूण ६१ कवितांचा समावेश असून, 'माय', 'बाप', 'धनत्रयोदशी शेतकऱ्याची', 'मातीच्या अश्रूंची कहाणी' आणि 'हमीभाव' यांसारख्या कविता वाचकांच्या काळजाला हात घालणाऱ्या आहेत. केवळ दु:खाचे प्रदर्शन न करता, बाजारातील अनिश्चितता आणि सावकारी पाश यांसारख्या संकटातही जिद्दीने उभा राहणारा 'शेतकरी' कवीने यात प्रभावीपणे मांडला आहे.संदीप वाकडे यांनी हा काव्यसंग्रह आपल्या कुटुंबाचा आधारस्तंभ असलेल्या आजी गं.भा. सखुबाई चंद्रभान वाकडे आणि कठीण परिस्थितीत आयुष्य फुलवण्यासाठी कष्ट उपसणारे आई-वडील सौ. संगीता व नानासाहेब वाकडे यांना कृतज्ञतापूर्वक अर्पण केला आहे. या लेखन प्रवासात त्यांना कन्नड तालुका साहित्य परिवाराचे संस्थापक डॉ. शिवाजी हुसे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले आहे. तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून प्रोत्साहन देणाऱ्या चाहत्यांमुळेच ही लेखणी अधिक प्रगल्भ झाल्याचे कवीने आवर्जून नमूद केले आहे.मातीत घाम गाळणाऱ्या प्रत्येक हाताच्या संघर्षाची साक्ष देणारा हा कवितासंग्रह मराठी साहित्य विश्वात शेतकऱ्यांचा बुलंद आवाज ठरेल, असा विश्वास साहित्यप्रेमींकडून व्यक्त केला जात आहे. या पुस्तकाच्या रूपाने ग्रामीण साहित्याला एक नवा पैलू मिळणार असून, लवकरच प्रकाशनाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार २० डिसेंबर २०२५

# संत गाडगे महाराज यांचे सामाजिक कार्य

**भा**रतीय समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक व नैतिक इतिहासात काही व्यक्तिमत्त्वे अशी आहेत की ज्यांचे कार्य केवळ त्यांच्या काळापुरते मर्यादित न राहता पुढील पिढ्यांना दिशा देणारे ठरते. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा, अस्वच्छता, दारिद्र्य आणि विषमता यांविरुद्ध आपल्या आचरणातून बंड पुकारणारे आणि उपदेशापेक्षा कृतीला अधिक महत्त्व देणारे थोर संत म्हणजे संत गाडगे महाराज होय. 20 डिसेंबर रोजी असणाऱ्या त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या सामाजिक कार्याचा मागोवा घेताना असे लक्षात येते की गाडगे महाराज हे केवळ कीर्तनकार किंवा संत नव्हते, तर ते एका व्यापक अर्थाने समाजसुधारक, लोकशिक्षक आणि परिवर्तनवादी विचारवंत होते. त्यांनी आपल्या संपूर्ण आयुष्याचा उपयोग समाजातील शेवटच्या घटकापर्यंत माणुसकी, स्वच्छता, शिक्षण आणि सामाजिक समतेचा संदेश पोहोचवण्यासाठी केला.गाडगे महाराजांचा जन्म एका अत्यंत साध्या, गरीब कुटुंबात झाला. बालपणापासूनच त्यांनी दारिद्र्य, उपेक्षा आणि सामाजिक विषमतेचे वास्तव जवळून अनुभवले. या अनुभवांनी त्यांच्या मनात समाजाबद्दल करुणा आणि अस्वस्थता निर्माण केली. समाजातील दु:ख, अज्ञान आणि अस्वच्छता ही केवळ दैवाची देणगी नसून मानवी निष्काळजीपणा, अज्ञान आणि शोषणाची परिणती आहे, ही जाणीव त्यांना लवकरच झाली. म्हणूनच त्यांनी देव, धर्म आणि अध्यात्म याकडे पाहण्याची पारंपरिक चौकट नाकारून माणूस, समाज आणि नैतिक कर्तव्य यांना केंद्रस्थानी ठेवले. त्यांच्या मते, देवाची खरी पूजा म्हणजे माणसाची सेवा आणि समाजहिताचे कार्य होय.संत गाडगे महाराजांच्या सामाजिक कार्याचा पाया त्यांच्या स्वच्छतेच्या विचारात दिसून येतो. स्वच्छता हा केवळ आरोग्याचा विषय नसून तो सामाजिक शिस्तीचा, आत्मसन्मानाचा आणि सभ्यतेचा निर्देशक आहे, असे त्यांचे ठाम मत होते. गावोगावी कीर्तनासाठी जात असताना ते सर्वप्रथम हातात झाडू घेऊन रस्ते, चौक, धर्मशाळा आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ करत. ही कृती केवळ साफसफाईपुरती मर्यादित नव्हती, तर ती समाजाला दिलेला मौनातील संदेश होता. 'स्वच्छता म्हणजे धर्म' हा विचार त्यांनी शब्दांत नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीतून रुजवला. लोकांना उपदेश करण्यापेक्षा त्यांनी स्वत: झाडू हातात घेतल्याने समाजमनावर त्याचा खोल परिणाम झाला. स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणाऱ्या समाजाला त्यांनी आरसा दाखवला.त्यांच्या कार्यातील आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे अंधश्रद्धा निर्मूलन. तत्कालीन समाजात देव-धर्माच्या नावाखाली अनेक गैरप्रथा, कर्मकांड आणि अंधश्रद्धा प्रचलित होत्या. गाडगे महाराजांनी यांना थेट आव्हान दिले. देवळात घंटा वाजवून, नारळ फोडून किंवा महागड्या पूजा करून समाजाचे भले होत नाही, तर शिक्षण, स्वच्छता, आरोग्य आणि मानवसेवा यातूनच समाज उन्नत होतो, असे ते ठामपणे सांगत. त्यांच्या कीर्तनांतून त्यांनी अंधश्रद्धेवर कठोर प्रहार केला. त्यांच्या भाषेत साधेपणा होता, पण आशयात प्रखर सामाजिक जाण होती. त्यामुळे त्यांच्या शब्दांचा प्रभाव ग्रामीण समाजावर विशेषतः मोठ्या प्रमाणात पडला.शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन आहे, याची जाणीव गाडगे महाराजांना होती. शिक्षणाविना समाज अज्ञानाच्या अंधारात राहतो आणि शोषणाला बळी पडतो, हे त्यांनी ओळखले होते. म्हणूनच त्यांनी शिक्षणासाठी निधी उभारण्याचे कार्य सुरू केले. कीर्तनातून मिळालेला पैसा त्यांनी स्वत:साठी कधीही वापरला नाही. हा पैसा त्यांनी शाळा, वसतिगृहे, धर्मशाळा आणि समाजोपयोगी संस्थांसाठी दिला. विशेषतः गरीब, दलित आणि वंचित समाजातील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी, यासाठी त्यांनी मोठे योगदान दिले. शिक्षण म्हणजे केवळ अक्षरओळख नव्हे, तर माणूस म्हणून जगण्याची कला आहे, असा त्यांचा विश्वास होता.गाडगे महाराजांच्या सामाजिक कार्यात जातिभेद आणि अस्पृश्यतेविरोधातील लढा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्या काळातील समाज कठोर जातीय विभागणीने ग्रासलेला होता. अस्पृश्यतेमुळे समाजातील मोठा वर्ग मूलभूत मानवी हक्कांपासून वंचित होता. गाडगे महाराजांनी या अन्यायाविरुद्ध निर्भीड भूमिका घेतली. त्यांनी आपल्या कीर्तनांतून आणि कृतीतून जातिभेदाचा निषेध केला. सर्व माणसे समान आहेत आणि त्यांचा सन्मान करणे हेच खरे धर्मकार्य आहे, असा संदेश त्यांनी दिला. त्यांच्या आश्रमांमध्ये आणि धर्मशाळांमध्ये जातपात न पाहता सर्वांना समान वागणूक दिली जात असे. ही कृती त्या काळातील सामाजिक व्यवस्थेला थेट आव्हान देणारी होती.दारिद्र्य निर्मूलन आणि गरिबांची सेवा हा गाडगे महाराजांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू होता. गरिबी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक आणि मानसिक गुलामगिरी निर्माण करते, असे त्यांचे मत होते. त्यामुळे गरिबांना मदत करताना केवळ दानधर्म न करता त्यांना स्वावलंबी बनवण्यावर त्यांनी भर दिला. भुकेल्याला अन्न देणे, आजारी व्यक्तीची सेवा करणे आणि संकटात सापडलेल्या माणसाला आधार देणे, हे त्यांना धार्मिक कृत्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे वाटत होते. त्यांच्या जीवनशैलीतून त्यांनी साधेपणा आणि त्यागाचे उदाहरण घालून दिले.गाडगे महाराजांचे कीर्तन हे केवळ धार्मिक प्रवचन नव्हते, तर ते एक सामाजिक व्यासपीठ होते. त्यांच्या कीर्तनांतून त्यांनी समाजातील प्रश्न मांडले, अन्यायावर टीका केली आणि परिवर्तनाची गरज अधोरेखित केली. त्यांच्या भाषेत ग्रामीण बोलीचा सहजपणा होता, त्यामुळे सामान्य माणसाला ते आपलेसे वाटत. त्यांनी कधीही अवघड तात्त्विक संकल्पना मांडल्या नाहीत, पण साध्या उदाहरणांतून त्यांनी खोल सामाजिक सत्ये उलगडली. त्यामुळे त्यांच्या कीर्तनांना मोठ्या प्रमाणावर लोक उपस्थित राहत आणि त्यांच्या विचारांचा प्रसार होत असे.स्त्री-सन्मान आणि स्त्रियांच्या स्थितीबाबतही गाडगे महाराजांची भूमिका प्रगत होती. त्या काळात स्त्रियांना शिक्षण, स्वातंत्र्य आणि सामाजिक सन्मान नाकारला जात होता. गाडगे महाराजांनी स्त्रियांकडे केवळ करुणेने नव्हे, तर समानतेच्या दृष्टीने पाहिले. स्त्री ही समाजाची अर्धी शक्ती आहे आणि तिच्या उन्नतीशिवाय समाजाचा विकास शक्य नाही, असा विचार त्यांनी मांडला. त्यांनी स्त्रीशिक्षणाला पाठिंबा दिला आणि स्त्रियांवरील अन्यायाविरुद्ध आवाज उठवला.संत गाडगे महाराजांच्या कार्यात धर्माची व्याख्या अत्यंत मानवी स्वरूपाची होती. त्यांच्या मते, धर्म म्हणजे मंदिर, मशीद किंवा चर्चपुरता मर्यादित नसून तो माणसाच्या आचरणात दिसून यायला हवा. स्वच्छता, प्रामाणिकपणा, करुणा, समानता आणि सेवाभाव हेच खरे धार्मिक मूल्ये आहेत. त्यांनी कर्मकांड, दिखावा आणि अंधश्रद्धेच्या नावाखाली चालणाऱ्या शोषणाचा तीव्र निषेध केला. त्यामुळे काही वेळा त्यांना विरोधालाही सामोरे जावे लागले, पण त्यांनी कधीही आपल्या विचारांशी तडजोड केली नाही.गाडगे महाराजांच्या सामाजिक कार्याचा प्रभाव त्यांच्या काळापुरता मर्यादित राहिला नाही. त्यांच्या विचारांनी पुढील अनेक समाजसुधारक, कार्यकर्ते आणि चळवळींना प्रेरणा दिली. स्वच्छतेचा संदेश, शिक्षणाचे महत्त्व, अंधश्रद्धेविरोधी भूमिका आणि सामाजिक समतेचा आग्रह हे सर्व विचार आजही तितकेच महत्त्वाचे आहेत. आजच्या काळातही समाज अस्वच्छता, अंधश्रद्धा, विषमता आणि नैतिक अध:पतन अशा समस्यांनी ग्रासलेला आहे. अशा परिस्थितीत गाडगे महाराजांचे विचार अधिकच समर्पक वाटतात.समकालीन समाजात गाडगे महाराजांच्या विचारांचे पुनर्मूल्यांकन करण्याची गरज आहे. स्वच्छ भारत अभियान, सामाजिक समता, शिक्षण सर्वांसाठी आणि अंधश्रद्धा निर्मूलन यांसारख्या उपक्रमांना गाडगे महाराजांच्या विचारांची वैचारिक बैठक लाभू शकते. त्यांनी दाखवलेला मार्ग म्हणजे केवळ सरकारी योजना किंवा कायदे नव्हेत, तर प्रत्येक नागरिकाने आपल्या आचरणातून समाजहित साधण्याचा मार्ग आहे. हातात झाडू घेऊन स्वच्छता करणे, गरजूला मदत करणे, शिक्षणाला प्रोत्साहन देणे आणि अंधश्रद्धेला प्रश्न विचारणे हीच गाडगे महाराजांना खरी श्रद्धांजली ठरू शकते.संत गाडगे महाराजांच्या जीवनाकडे पाहिले तर असे लक्षात येते की त्यांनी कधीही प्रसिद्धी, सत्ता किंवा संपत्तीचा पाठलाग केला नाही. त्यांचे संपूर्ण आयुष्य सेवाभाव, त्याग आणि सामाजिक बांधिलकीचे प्रतीक होते. त्यांनी समाजाला उपदेश केला नाही, तर स्वत: उदाहरण घालून दिले. म्हणूनच ते केवळ संत नव्हते, तर ते एक जिवंत सामाजिक चळवळ होते. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या सामाजिक कार्याचा स्मरण करताना आपल्यालाही आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे, आपण समाजासाठी काय करत आहोत, हा प्रश्न स्वत:ला विचारण्याची हीच योग्य वेळ आहे.अशा या थोर समाजसुधारकाच्या स्मृतीला वंदन करताना एवढेच म्हणावेसे वाटते की संत गाडगे महाराजांचे विचार हे काळाच्या पुढे जाणारे होते. त्यांनी दाखवलेला मानवतेचा, समतेचा आणि सेवाभावाचा मार्ग आजही तितकाच प्रकाशमान आहे. समाजातील प्रत्येक घटकाने त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेतली, तर खऱ्या अर्थाने सामाजिक परिवर्तन घडू शकेल. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे केवळ भूतकाळाची उजळणी नव्हे, तर वर्तमान आणि भविष्य घडवण्याची प्रेरणा घेणे होय.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra५@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002